# रविंद्रनाथ टागोरांच्या
# अप्रतिम कथा

**रविंद्रनाथ टागोर**

अनुवाद

**मेधा मराठे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**रविंद्रनाथ टागोरांच्या अप्रतिम कथा :** रविंद्रनाथ टागोर
अनुवाद : मेधा मराठे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
मेधा ना. मराठे
३रा रस्ता, भाग्यनगर,
सुखकर्ता अपार्टमेंटजवळ, बेळगावी - ५९०००६
मो. नं. : ०९४४९७०२१६१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३००/-

# विश्वकवी रविंद्रनाथ टागोर

गुरुदेव रविंद्रनाथ टागोर 'विश्वकवि' मानले जातात. कथाकार, गीतकार, संगीतकार, नाटककार, निबंधकार आणि चित्रकार अशा सर्वांगाने कलापूर्ण असलेल्या या बंगाली भाषेतील लेखकाने श्रेष्ठ अशा भारतीय संस्कृतीचा परिचय पश्चिमी देशांना आणि पश्चिमी देशांतील संस्कृतीचा परिचय भारतीयांना करून दिला.

रविंद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ मध्ये कलकत्ता येथे झाला. श्री. देवेंद्रनाथ टागोर आणि शारदादेवी यांचे ते सुपुत्र होत. त्यांचं घराणं संपन्न होतं. साहित्य, कविता, नृत्य, संगीत यांची त्यांना लहानपणापासून ओढ होती. रविंद्रनाथांचं शिक्षण सेंट झेवियर स्कूलमध्ये झालं. बॅरिस्टर होण्यासाठी ते १८७८ मध्ये लंडनला गेले; परंतु १८८० मध्ये डिग्री न घेता ते परतले. पिता देवेंद्रनाथ यांना वाटत होतं की, रविंद्रनाथ बॅरिस्टर व्हावेत; परंतु रविंद्रनाथांचं मन साहित्यात रमत होतं. भारतात आल्यावर त्यांनी लिहायला सुरुवात केली.

गुरुदेव टागोरांनी बंगाली साहित्यात प्रथमच नव्या प्रकाराने गद्य तसेच छंद व लोकभाषेचा उपयोग केला. पूर्वापार चालत आलेल्या संस्कृत भाषेच्या प्रभावापासून त्यांचं लेखन मुक्त होतं. लहान वयातच त्यांनी काव्यलेखनाला सुरुवात केली होती. १८९० पर्यंत त्यांची कवितांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली. भारताचे राष्ट्रगीत 'जन-गण-मन' आणि बांग्लादेशाचे राष्ट्रगान 'आमार सोमार बाँगला' या त्यांच्याच रचना आहेत. वैश्विक समानता, मानवता हा त्यांच्या विचारांचा व साहित्याचा पाया होता. माणसांच्या भावभावनांना केंद्रिभूत ठेवून त्यांच्या काव्यकथांची रचना असे. शाश्वत प्रेम, असीम इच्छा आणि मनुष्यजीवनाचं अंतिम ध्येय प्रामुख्याने त्यांच्या लेखनातून प्रतीत होते. या समाजात सहज आढळणाऱ्या सर्वसामान्य माणसाच्या त्यांच्या कथा आहेत. घटना आणि

वातावरणही जवळपास दिसणारं आहे. रविंद्रनाथ टागोर पद्मा नदीच्या एखाद्या हाऊसबोटवर वास्तव्य करीत असत. आसपासच्या खेड्यातील ग्रामीण लोकांशी त्यांचा संपर्क असे. त्यामुळे खेडवळ लोकांचं दारिद्र्य आणि मागासलेपण हा त्यांच्या कथांचा गाभा असायचा. त्यांचं दीनवाणं जगणं, दैनंदिन जीवनातील आचार-विचार यांचं बारीकसारीक वर्णनही त्यांच्या कथांतून सविस्तरपणे वाचायला मिळतं. त्यातून मार्मिकतेबरोबरच हलकंफुलकं विडंबनही त्यांच्या कथांतून विशेष जाणवतं. सुप्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक सत्यजित राय यांनी आपल्या चित्रपटात ते कौशल्याने दर्शविले आहे.

त्यांच्या ८४ कथांतून अनुवादासाठी काही थोड्या निवडणं हे कठीण आहे. त्यांच्या कथांत पाऊस, नद्या, नद्यांचे किनारे, पावसाळी आकाश, झाडांच्या सावल्या असलेली गावं, पिकं तरारलेली शेतं यांची चित्रवत वर्णने आहेत. त्यांचा कथेतील सर्वसामान्य नायक कथा संपता संपता अगदी विलक्षण असामान्य वाटू लागतो. त्याचं दुःख आपलं होऊन जातं. पोस्टमास्टर, काबुलीवाला, दीदी अशा अनेक कथा अंतःकरणाला भिडतात. समाजातील स्त्रीचं स्थान आणि स्त्रीजीवनाची तत्कालीन वैशिष्ट्ये ही त्यांच्या कथांतून गांभीर्याने येतात. त्यांनी या विषयांचा केलेला सखोल विचार कथांतून मांडला आहे. त्यामुळे त्यांच्या कथेतील पात्रे चिरस्मरणीय झाली आहेत.

साहित्य लेखनाबरोबरच त्यांनी 'शांतिनिकेतन' व 'विश्वभारती'ची स्थापना केली. राजनैतिक क्षेत्रातही त्यांनी सक्रिय भाग घेतला. १९०५ मधील बंगालच्या विभाजनाला विरोध केला. १९१९ मधील जालियनवाला बाग हत्याकांडाच्या निषेधार्थ इंग्रज सरकारने दिलेली 'नाइटहुड' ही उपाधी त्यांनी परत केली.


१९१३ मध्ये 'गीतांजली'साठी त्यांना नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. 'गीतांजली'चे देश-विदेशातील अनेक भाषांत अनुवाद झाले आहेत. बंगदर्शन आणि साधना ही पत्रे त्यांनी संपादित केली आहेत.

त्यांच्या संपूर्ण साहित्यातून शांती, स्वतंत्रता आणि विश्वबंधुत्वाचा उदात्त आदर्श प्रकर्षाने जाणवतो. कवी, कथाकार, नाटककार, समालोचक, अभिनेता, चित्रकार, वक्ता, संपादक, विश्वपर्यटक, संगीतकार, शिक्षणशास्त्रज्ञ, दार्शनिक, राष्ट्रभक्त आणि महामानवाच्या रूपात ते आपलं चैतन्य संपूर्ण जगभर पसरवितात.

७ ऑगस्ट १९४१ ला त्यांचा देहान्त झाला. एक शांत, आनंदी आणि महामानव असं त्यांचं चित्र भारतीयांच्याच नव्हे, तर विश्वभर असलेल्या त्यांच्या भक्तांच्या मनात सदैव वास करत आहे आणि मानवतेचा संदेश देत आहे.

**– मेधा मराठे**

✦✦✦



# कथानुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | हाडांचा सांगाडा | ९ |
| २. | मावशी | १८ |
| ३. | हुंडा | ३० |
| ४. | मूर्ख रामकन्हाई | ३७ |
| ५. | न्यायाधीश | ४३ |
| ६. | मध्यरात्री | ५१ |
| ७. | दीदी | ६४ |
| ८. | मुन्नाबाळ परत आला आहे | ७५ |
| ९. | एक रात्र | ८४ |
| १०. | त्याग | ९१ |
| ११. | सुट्टी | ९८ |
| १२. | सुभा | १०६ |
| १३. | महामाया | ११३ |
| १४. | कवीचं हृदय | १२१ |
| १५. | समाजाचा बळी | १२४ |
| १६. | बंडखोर | १२८ |
| १७. | पाषाणमूर्ती | १३६ |
| १८. | शेजारीण | १५५ |
| १९. | रासमणीचा पुत्र | १६० |
| २०. | काबुलीवाला | १९५ |

२१. शिक्षक .................................................. २०४
२२. दालिया .................................................. २१८
२३. पोस्टमास्तर .............................................. २२७
२४. अंतिम प्रेम ............................................... २३१
२५. एक होता राजा ......................................... २४३

✦✦✦

## हाडांचा सांगाडा

लहानपणी ज्या खोलीत आम्ही तीन मित्र झोपत होतो, त्याच्या शेजारच्या खोलीत भिंतीवर एक हाडांचा पूर्ण सांगाडा लटकत होता. रात्री वारा आला की, त्यातली हाडं खट्खट् आवाज करत आपटत हलत राहत. दिवसा आम्हाला ती हाडं हलवावी, हाताळावी लागत. त्या काळात पंडित सर आम्हाला मेघनाद-वध शिकवत होते. त्याचप्रमाणे केम्बल स्कूलचा एक विद्यार्थी आम्हाला अस्थी-विद्या शिकवीत होता. आमच्या संस्थेच्या चालकांची अशी इच्छा होती की, आम्हा विद्यार्थ्यांना सर्व विद्यांमध्ये एकाच वेळी पारंगत करावं. त्यांचा उद्देश किती सफल झाला याबद्दल आम्हाला ओळखणाऱ्या लोकांसमोर बोलण्यात काहीच अर्थ नाही आणि जे आम्हाला ओळखत नाहीत त्यांच्यापासून लपवणं हेच उत्तम.

त्यानंतर खूप काळ लोटला. मधल्या काळात त्या खोलीतील सापळा आणि आमच्या डोक्यातील अस्थी-विद्या कुठे गायब झाली याचा शोधूनसुध्दा पत्ता लागला नाही.

काही दिवसांपूर्वी एका रात्री दुसरीकडे काही कारणाने जागा नसल्यामुळे मला त्याच खोलीत झोपावं लागलं. अभ्यास नसल्याने झोप येत नव्हती. एकसारखी कुशी बदलता बदलता चर्चच्या मोठ्या घंटांनी जवळजवळ सारे टोले वाजविले. इतक्यात माझ्या खोलीतील कोनाड्यात जळणारा तेलाचा दिवा पाच मिनिटं भगभगत राहिला आणि मग एकदम विझला. या घटनेच्या काही काळ आधीच आमच्या घरात एक दोन दुर्घटना घडल्या होत्या. म्हणून दिवा विझल्यामुळे आपोआप मृत्यूची आठवण मनात जागी झाली. मनात विचार आला की, रात्रीच्या दुसऱ्या प्रहरी घनदाट अंधारात हा प्रकाशाचा किरण विलीन झाला. निसर्गात तसंच घडतं. मनुष्याचे छोटे छोटे प्राणप्रकाश दिवसा-रात्री केव्हातरी अचानक विझून विस्मृतीत जातात.

पाठोपाठ त्या सांगाड्याची आठवण आली. त्याच्या सजीव आयुष्याची कल्पना करता करता असं भासलं की, कोणी एखादा सजीव प्राणी अंधारात

खोलीच्या भिंती चाचपत माझ्या पलंगाच्या चारी बाजूंनी फिरतोय. त्याच्या जड श्वासाचा आवाज मला ऐकू येतोय. जणू तो काहीतरी शोधतोय; पण त्याला ते मिळत नाहीये. त्यामुळे अगदी वेगाने तो गोल गोल फिरतोय. झोप न लागल्याने डोकं गरम झालं होतं आणि गरम डोक्यात आलेली ती भन्नाट कल्पना आहे हे मला कळत होतं. माझ्या डोक्यात सूंसूं करत वेगाने रक्त वाहत होतं. त्याचाच आवाज मला पावलांच्या आवाजासारखा वाटत असावा. तरीसुध्दा माझं सगळं शरीर भीतीने थरारलं. कारणाशिवाय वाटणारी ही भीती दूर करण्यासाठी मी विचारलं –''कोण आहे?''

पावलांचा आवाज माझ्या पलंगाजवळ येऊन थांबला आणि उत्तर आलं, ''मी. माझा तो सांगाडा कुठे गेला ते शोधायला आलेय.''

मी विचार केला, काल्पनिक सृष्टी निर्माण करून घाबरणं योग्य नाही. मी मऊ पायपुसण्यावर प्रयत्नपूर्वक पावलं घट्ट ठेवली आणि चिरपरिचित व्यक्तीशी बोलावं तशा सहज स्वरात म्हणालो, ''अर्ध्या रात्री चांगलं काम काढलंय. त्या सांगाड्याची या वेळी तुला काय गरज?''

अंधार होता; पण छपरी पलंगाच्या अगदी जवळून उत्तर आलं, ''असं कसं म्हणतोस? माझ्या छातीची हाडं त्यातच नव्हती का? माझं २६ वर्षांचं तारुण्य त्याच्याच आधाराने उमललं होतं. मग एकदा तरी तो बघावा अशी इच्छा होणार नाही का?'' मी चटकन म्हटलं, '' हो. हो. अगदी योग्य आहे. तू शोध. मी झोपण्याचा प्रयत्न करतो.''

तिनं विचारलं, ''एकटाच आहेस? तर मी थोडा वेळ बसते. जरा गप्पाटप्पा करू. ३५ वर्षांपूर्वी मीसुध्दा मनुष्याच्या शेजारी बसून मनुष्याशीच गप्पा मारत होते. गेली ३५ वर्षे मी फक्त स्मशानाच्या आवारात हूं...हूं... आवाज करत फिरत राहिले आहे. आज तरी तुझ्याजवळ बसून पुन्हा एकदा मनुष्यासारख्या गप्पागोष्टी करीन.''

कोणीतरी मच्छरदाणीजवळ येऊन बसल्याचा भास झाला. माझा नाइलाज झाला. मग खोट्या उत्साहाने बोललो –''ठीक आहे मग. मनाला उत्साह वाटेल अशी काही कथा ऐकव बरं.''

ती म्हणाली –''सगळ्यात जास्त मजेशीर कथा ऐकायची असेल तर माझीच जीवनकथा तुला ऐकवते.''

चर्चच्या घड्याळाचे टण्-टण् असे दोन टोले वाजले.